

5

# ध्येय प्राप्तीसाठी टीम तयार करा



## ध्येय दोन प्रकारचे असू शकते

१. व्यक्तिगत

२. सांघिक

व्यक्तिगत ध्येय साध्य करताना व्यक्तिगत योगदान जास्त असते. मात्र सांघिक ध्येय साध्य करताना व्यक्तिगत योगदान पुरेसे ठरत नाही इतरांचेही योगदान महत्त्वपूर्ण असते. उदाहरणार्थ - क्रिकेटचा संघ घ्या. भारतीय क्रिकेट संघाला सामना जिंकायचा झाला तर त्यासाठी संघातील सर्व खेळाडूंचे योगदान महत्त्वाचे ठरेल कारण सामना जिंकणे हे व्यक्तिगत ध्येय नसून सांघिक ध्येय आहे. मंडळी, संस्था किंवा कंपनी यांचे ध्येय सांघिक कामगिरीवर अवलंबून असते. ज्या पुढाऱ्याला आपल्या संघातील लोकांना सोबत घेऊन पुढे जाणे जमते तोच आपल्या मंडळीचे, संस्थेचे किंवा कंपनीचे ध्येय गाठू शकतो.

आपल्याकडे संघ असेल तर आपले काम फार प्रभावी आणि वेळेत पूर्ण होऊ शकते हे समजून घेण्यासाठी आपण भिंगाचे आणि साध्या काचेचे उदाहरण घेऊ शकतो. एखाद्या कागदावर सूर्यप्रकाशात साधी काच धरली तर कागद जळत नाही मात्र साध्या काचेऐवजी भिंग वापरले तर सूर्याचे सर्व किरण त्यावर एकत्र होतात आणि तो कागद जळतो. भिंगात सूर्याच्या सर्व किरणांना एकत्र आणण्याची क्षमता असल्याने हे शक्य होते. जो खरा पुढारी आहे तो सर्वांच्या क्षमतेला एकत्र करण्याचे महत्त्व ओळखतो आणि त्यांना एकत्रित करून



त्यांच्याकडून एक प्रभावी कार्य करून घेतो.

**T**ogether

**E**veryone

**A**chieve

**M**ore

नहेम्या राजमहालातील सुख व चैन सोडून यरुशलेमेस आला होता. आपल्या देशाच्या व देशबांधवाच्या प्रेमापोटी शहराच्या पडलेल्या भिंती बांधण्याचे/दुरुस्तीचे ध्येय त्याने व्यक्तीगतरित्या निश्चित केले असले तरी ते ध्येय तो एकटा पूर्ण करू शकत नव्हता. हा मोठा प्रकल्प होता. त्याला संघाची गरज होती. हे माझे ध्येय आहे मी एकटाच ते पूर्ण करणार मला कोणाच्या मदतीची गरज नाही असा विचार त्याने केला नाही. त्याचे ध्येय त्याने आपल्या लोकांना विदित केले आणि ते पूर्णत्वास नेण्यासाठी त्यांना त्यात सामील करून घेतले.

यरुशलेमेचे पडलेले तट बांधण्याचे धैर्य पूर्णत्वास नेणे किती महत्त्वाचे आहे हे नहेम्याने आपल्या लोकांना समजावून सांगितले व ते आपण सर्व मिळून साध्य करू शकतो असा आत्मविश्वास त्याने त्यांच्यात जागृत केला. तो त्यांना म्हणाला, "**आपण** केवढ्या दुर्दशेत आहोत हे तुम्हांला दिसतच आहे; यरुशलेम उजाड झाले आहे, व त्याच्या वेशी अग्नीने जळून गेल्या आहेत; तर चला, **आपण** यरुशलेमेचा कोट बांधू म्हणजे ह्यापुढे **आपली** अप्रतिष्ठा व्हायची नाही"(नहेम्या २:१७).

सांघिक कामगिरी करताना 'मी' असा शब्द येत नसतो तर 'आपण' येतो. नहेम्याने त्यांना सांगितले की, देवाचा वरदहस्त त्याच्यावर आहे व राजा त्याला काय-काय बोलला तेही त्यांना

सांगितले. तेव्हा ते म्हणाले, “चला, **आपण** उठून बांधण्याच्या कामास लागू.” तेव्हा त्यांनी ते सत्कार्य करण्याची हिंमत बांधली.

जेव्हा एक पुढारी आपले दर्शन लोकांना अगदी स्पष्ट करून सांगतो तेव्हा टीम मधील लोक तयार होतात आणि म्हणतात, **“चला आपण हे करूया.”**

नहेम्याने प्रामुख्याने तीन गोष्टी केल्याचे आपल्याला येथे दिसून येते.

१) त्याने ध्येय स्पष्ट करून सांगितले.

२) त्याने जबाबदारी वाटून दिली.

३) त्याने त्यांच्यावर विश्वास ठेवला.

नहेम्याने उंटावरून शेळ्या हाकल्या नाहीत. भिंत बांधण्याचे काम चालू असताना तो स्वतः जातीने तेथे हजर होता आणि भिंत बांधण्याच्या कामात हातभार लावू लागला (नहेम्या ५:१६). स्वतः सुभेदार असूनही तो दररोज आपल्या इस्राएली बांधवांसोबत “पहाटेपासून तारे दिसू लागत तोपर्यंत” होता (नहेम्या ४:२१). पुढारीपण म्हणजे एक प्रभाव आहे हे त्याने दाखवून दिले. पुढाऱ्याचा आपल्या लोकांवर खरा प्रभाव त्याच्या बोलण्यातून नाही तर कृतीतून पडतो. एक पुढारी या नात्याने आपण नहेम्याचे अनुकरण केले पाहिजे.

> मालक आणि चांगला पुढारी ह्यांच्यामधील फरक लक्षात ठेवा : मालक 'जा' म्हणतो आणि चांगला पुढारी 'आपण जाऊया' असे म्हणतो
>
> ~ इ.एम. केली

प्रिय वाचकांनो,

**'ध्येय प्राप्तीच्या चाव्या'** या पुस्तकातील अध्याय 5 ची ही तीन पाने आहेत. या पुस्तकाची एकूण पृष्ठ संख्या 200 आहे (कवर सहित). हे पुस्तक आपल्याला हवे असल्यास कृपया खालील क्रमांकावर संपर्क साधावा. धन्यवाद 🙏

**लेखक** – 8485877232


**प्रकाशक** – 9975873569

| | |
|---|---|
| • पुस्तकाची मूळ किंमत | ₹ 350/ - |
| • एक पुस्तक घेतल्यास डिस्काऊंटसह किंमत | ₹ 315/- |
| • पाच पेक्षा अधिक पुस्तके घेतल्यास एका पुस्तकाची डिस्काऊंटसह किंमत | ₹ 300/- |
| • घरपोच फ्री डिलिव्हरी | |

पवित्र शास्त्रावर आधारित

# ध्येय प्राप्तीच्या चाव्या

नहेम्याच्या जीवनातून



राज धुदाट

ISBN 978-81-949970-0-9

**पवित्र शास्त्रावर आधारित**

# ध्येय प्राप्तीच्या चाव्या

**नहेम्याच्या जीवनातून**

**लेखक**

**राज धुदाट**

7083900966

**कवितासागर पब्लिशिंग हाउस**

9975873569

- KavitaSagar Publishing House, Jaysingpur
- International Standard Book Number: 978-81-949970-0-9
- Title - Keys to Achieving Goals (ध्येय प्राप्तीच्या चाव्या)
- Author - Raj Dhudat
- Post box: 93, Jaysingpur - 416101, Taluka - Shirol,
  District - Kolhapur, Maharashtra, India
  Contact: 7083900966, rajdhudat@gmail.com
- Year of Publication –16th August 2023
- Edition - First
- Volume - One
- Price - ₹ 350/-
- Subject - Leadership / Personality Development
- Language - Marathi
- Pages - 200 pages including cover.
- Copyright © Raj Dhudat
- Published in India in 2023 by - Dr. Sunil Patil
  KavitaSagar Publishing House (कवितासागर पब्लिशिंग हाउस)
  Post box: 69, Jaysingpur - 416101, Taluka - Shirol,
  District - Kolhapur, Maharashtra, India.
  Contact - 9975873569, 8484986064
  sunildadapatil@gmail.com
- Printed by - Dr. Sunil Patil
  on behalf of KavitaSagar Printing Services, Jaysingpur.
- Typesetting and Distributed by
  Dhudat Publishing House, Jaysingpur.
- Cover Design by - Bro. Jeff
- Proof reading by - Mrs. Sanjivani Sunil Patil
- Scripture quotations taken from Marathi R.V.© 2015